महाराष्ट्र शासन

जिल्हा परिषद रत्नागिरी जाहिरात क्रमांक 1/2017

राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान,

# जिल्हा स्तरावरील कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांची जाहिरात

**(शा. नि. क्र. रागापां-2013/प्रक्र.140/योजना -4 दि. 06.08.2014)**

राजीव गांधी पांचायत सशक्तीकरण अभियानाची परिणामकारकरित्या अंमलबजावणी करण्यासाठी निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात व कंत्राटी पध्दतीने जिल्हा स्तरावरील खालील पदांची भरती करण्यात येणार आहे. त्यासाठी पात्र व इच्छूक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. भविष्यात या पदांवर शासनामध्ये कायम करण्याचा हक्क सांगता येणार नाही,या अटींवरच उमेदवाराने अर्ज भरावा. पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अक्र | जिल्हा स्तरावर मंजूर पदे | संख्या | पदाची शैक्षणिक अर्हता, लागणारा अनुभव, आर्थिक मोबदला, अटी व शर्ती, कामाचे स्वरूप,निवड प्रक्रिया अर्जाचा नमुना इ.बाबतचा सविस्तर तपशिल http://ratnagiri.nic.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेला आहे. |
|---|---|---|---|
| 1 | **लिपिक** | 1 | |
| 2 | **लेखापाल** | 1 | |

(वरील पदे एकाकी असल्यामुळे आरक्षण निर्धारीत केलेले नाही)

**जिल्हा स्तरावरील पदांसाठी अर्ज** करण्याचा पत्ता व संपर्कासाठी माहिती

**मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद रत्नागिरी**

**(सामान्य प्रशासन विभाग,तिसरा मजला)**

**(दूरध्वनी क्रमांक 02352/222428. ईमेल आयडी dyceogad08@gmail.com)**

अर्ज स्विकारण्याचा अंतिम दिनांक 08 जानेवारी 2018

1) अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकाच्या कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा, अपूर्ण स्वरूपातील माहिती भरलेल्या, ई-मेल व्दारे पाठवलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. जाहिराती मधील सूचना व माहितीचा काळजीपूर्वक अभ्यास करून विहित नमुन्यात पोस्टाने किंवा प्रत्यक्ष विहित दिनांकापूर्वी आणि विहित नमुन्यात अर्ज दाखल करावेत.

2) पद भरती प्रक्रियेत कोणताही आणि केव्हाही बदल करण्याचा, पद संख्येत बदल करण्याचा अथवा भरती प्रक्रिया रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार **मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी तथा जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे प्रमुख यांना राहतील.**

जा. क्र.रजिप/साप्रवि/आस्था-3/5978/2017

सामान्य प्रशासन विभाग,जिल्हा परिषद रत्नागिरी

दिनांक :19.12.2017

(सही/-लक्ष्मीनारायण मिश्रा,भा.प्र.से)

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद रत्नागिरी

**महाराष्ट्र शासन**

**राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान 2017-18**

**जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्षामध्ये कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवारांस महत्वाच्या सूचना.**

1) उमेदवाराने प्रत्येक पदासाठी **स्वतंत्र अर्ज करणे** आवश्यक राहील.

2) **वयोमर्यादा –**

- जिल्हास्तरावरून भरती करावयाच्या सर्व पदांसाठी वयाची अट ही किमान 18 वर्षे व कमाल 38 वर्षे आणि मागासवर्गीयांसाठी 43 वर्षे राहील.
- उमेदवारांच्या वयाची किमान व कमाल मर्यादा ही अर्ज करावयाच्या शेवटच्या दिनांकास म्हणजे दि. **08.01.2018** अखेर ग्राहय धरण्यात येईल.

3) अर्जा सोबत जोडावयाच्या **कागदपत्राच्या सत्य प्रती** :

- शैक्षणिक पात्रतेसंदर्भात १२ वी / पदवी/ पदव्युत्तर प्रमाणपत्र.
- १२ वी / पदवी / पदव्युत्तर गुणपत्रिका (मार्क लिस्ट).
- वयाचा पुरावा
- जातीचा दाखला / क्रिमीलेअर प्रमाणपत्र
- अनुभवाचे प्रमाणपत्र
- पुरस्कार / प्रशस्तीपत्रक
- इतर अनुषंगिक प्रमाणपत्र / कागदपत्रे

4) **अर्ज शुल्क**

- अर्ज शुल्क रक्कम रु. 200/- (मागासवर्गीयांसाठी रू. १००/-) राहील. माजी सैनिकांसाठी अर्ज शुल्क माफ राहील.
- विहित अर्ज शुल्काप्रमाणे कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा व ज्या ठिकाणी अर्ज करणार आहे तेथील प्राधिकरणाच्या नावे व त्याच मुख्यालयाच्या ठिकाणी देय असलेला डिंमाड ड्राफट (धनाकर्ष) काढून अर्जासोबत जोडावयाचा आहे.
- **डिंमाड ड्राफट च्या पाठीमागे अर्जदाराने स्वत:चे संपूर्ण नाव व पत्ता लिहणे आवश्यक आहे.** तसेच ज्या पदासाठी अर्ज दाखल केलेला आहे त्या पदाचे नाव लिहिणे आवश्यक आहे.
- अर्ज शुल्काची रक्कम ना परतावा राहील.

5) महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अजा, अज, निज (विजा), भज, विमाप्र आणि इमाव यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ आणि साप्रवि शासन निर्णय दिनांक २४ जुलै, २०१४ अन्वये शैक्षणिक आणि सामाजिक दृष्टया मागास प्रवर्ग (ESBC), विमाप्र-अ (SBC-A) अन्वये संबंधित पद भरतीसाठी आरक्षण लागू राहील. प्रचलित शासन

धोरणाप्रमाणे क्रिमीलिअर / नॉन क्रिमीलिअर प्रमाणपत्र लागू राहील. जात वैधता प्रमाणपत्र कंत्राटी नियुक्तीच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आत सादर करणे संबंधित उमेदवारास बंधनकारक असेल.

6) महिला आरक्षणामधून राखीव पदाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांमधून पदे भरण्यात येतील.पदांच्या संख्येतील बदलाची शक्यता असल्याने त्याप्रमाणे आरक्षणात बदल होईल.

7) संबंधित पदासाठी करावयाचा अर्जाचा विहित नमुना संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेला आहे. त्या संकेत स्थळावरून डाऊनलोड करून वापरावा.

८) विहित केलेल्या कालावधीत ऑनलाईन / पोस्टाने / समक्ष अर्ज स्विकारण्याची पद्धत ठरविण्याची व अवलंबिण्याचे अधिकार संबंधित प्राधिका-यास राहतील. वरील ठरविलेल्या पद्धतीप्रमाणे अर्ज सादर करणे संबंधित उमेदवाराला बंधनकारक असेल.

९) उमेदवाराने ऑनलाईन किंवा पोस्टाने किंवा समक्ष अर्ज दिनांक 08.01.2018 पर्यंत कार्यालयीन वेळेत सायं. ५.४५ पूर्वी सादर करावा.विहित कालावधी नंतर प्राप्त झालेले, अपूर्ण असलेले, ई-मेल द्वारे पाठविलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

10) अर्ज पाठविताना पाकिटावर ज्या पदासाठी अर्ज केलेला आहे. त्या पदाचा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

11) नैसर्गिक आपत्तीमुळे अथवा अन्य कारणास्तव विहित दिनांकास कौशल्य चाचणी / मुलाखत घेणे शक्य न झाल्यास पुढील दिनांक निश्चित करण्याचे अधिकार संबंधित राज्यस्तरीय / विभागस्तरीय / जिल्हास्तरीय कार्यालयीन प्रमुखांना राहतील.

१२) संबंधित उमेदवाराने अर्ज केल्यानंतर संबंधित कार्यालय प्रमुख अर्जाची छाननी करून पात्र / अपात्र असलेल्या अर्जाची **अंतरीम यादी** प्रसिद्ध करतील व ही यादी संबंधित कार्यालयाच्या संकेतस्थळावर विहित तारखेस प्रसिद्ध करण्यात येईल.

**१३) अंतरीम यादीवर उमेदवाराचे आक्षेप** असल्यास त्यांनी आवश्यक त्या पुराव्यासह विहित कालावधीपूर्वी आक्षेप दाखल करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केला जाणार नाही. उमेदवाराच्या आक्षेपाप्रमाणे कागदपत्रांच्या आधारे शहानिशा करून पात्र उमेदवारांची **अंतिम यादी** विहित कालावधीत प्रसिद्ध करण्यात येईल.

14) उमेदवाराने विहित नमुना **अर्जातील * चिन्ह असलेली माहिती** भरणे बंधनकारक असेल. उमेदवाराला संबंधित कार्यालयाकडून तातडीने संपर्क करणे, भरती प्रकियेतील प्रत्येक स्तरावरील माहिती उमेदवाराला तात्काळ कळविण्यासाठी **ई-मेल** पत्ता देणे आवश्यक आहे. भरती प्रकियेच्या कालावधीत उमेदवाराने आपला **ई-मेल** नियमितपणे उघडावा व माहिती पहावी. तसेच उमेदवाराला SMS द्वारे किंवा दूरध्वनी द्वारे संदेश देण्यासाठी संबंधिताने **मोबाईल क्रमांक** देणे अनिवार्य आहे.

१५) अंतिम यादी मधून कौशल्य चाचणीसाठी/ मुलाखतीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी संबंधित जिल्हा राज्यस्तरीय कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्व करण्यांत येईल. तसेच संबंधित कार्यालयाच्या संकेत स्थळांवर प्रसिद्व करण्यांत येईल.

16) निवड प्रक्रियेत पात्र ठरलेल्या उमेदवाराची मूळ प्रमाणपत्रे तपासल्यानंतरच त्यांना नियुक्ती आदेश देण्यात येईल. कागदपत्रामध्ये त्रुटी आढळल्यास कोणत्याही स्तरावर उमेदवारास अपात्र ठरविण्यांत येईल किंवा नियुक्ती रद्द करण्यात येवून संबंधितांवर कायदेशिर कारवाई करण्यात येईल.

17) राज्य प्रकल्प संचालक/ विभागीय आयुक्त / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना नियुक्ती अधिकारी या नात्याने कोणत्याही उमेदवारांची अंतिम निवड करण्याचे अथवा नाकारण्याचे संपूर्ण अधिकार राहतील. तसेच वरील पद भरती प्रकियेत कोणताही आणि केव्हाही बदल करण्याचापद संख्येत बदल करण्याचा ,अथवा भरती प्रकिया रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार राहतील.

**१८)जिल्हास्तरावरील कंत्राटी पद भरतीचा** कार्यक्रम / प्रक्रिया खालील वेळापत्रकाप्रमाणे राहील. याप्रक्रियेत अपवादात्मक परिस्थितीत बदल करण्याचे अधिकार संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना राहतील

19) आर्थिक मोबदला, शैक्षणिक पात्रता, अनुभव,इ. माहिती-

| अ.क्र. | पदाचे नाव | मासिक वेतन (रूपये) | अर्हता/अनुभव |
|---|---|---|---|
| 1 | लेखापाल | रू.२०,०००/- (अक्षरी रूपये वीस हजार) पर्यंत दरमहा | शैक्षणिक अर्हता- १.शासन मान्यताप्राप्त संस्थेचा वाणिज्य क्षेत्रातील पदवीधर /पदव्युत्तर<br>२.टॅली प्रोग्रॅम हाताळणेत प्राविण्य आवश्यक<br>३.संगणकाचे ज्ञान आवश्यक |
| | | | अनुभव- कार्यालयीन कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. |
| 2 | लिपीक | रू.१५,०००/- (अक्षरी रूपये पंधरा हजार) पर्यंत दरमहा | शैक्षणिक अर्हता- १.शासन मान्यताप्राप्त संस्थेचा कोणत्याही शाखेचा पदवीधर<br>२.मराठी-३० व इंग्रजी ४० श.प्र.मि. परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक. |
| | | | अनुभव- कार्यालयीन कामकाजाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असणाऱ्या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल. |

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| 1 | वर्तमानपत्रात जाहीरात देणे | 21 .12.2017 |
| 2 | अर्ज करण्याची अंतिम दिनांक (सायंकाळी ५.४५ वाजे पर्यंत) | 08.01.2018<br>(सोमवार) |
| 3 | प्राप्त अर्जाची छाननी व पात्र उमेदवारांची अंतरीम यादी जाहीर करणे | 10.01.2018<br>(बुधवार) |
| 4 | अंतरीम यादीबाबत उमेदवारांचे आक्षेप /हरकतीसाठी शेवटचा दिनांक | 12.01.2018<br>(शुक्रवार) |
| 5 | पात्र अर्जांची अंतिम यादी  कौशल्य चाचणीसाठी जाहीर करणे. | 16.01.2018<br>(मंगळवार) |
| 6 | पात्र उमेदवारांची कौशल्य चाचणी घेणे व कौशल्य चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची अंतिम निवड यादी जाहीर करणे. | 17.1.2018<br>(बुधवार) ते<br>20.1.2018<br>(शनिवार) |
| 7 | जिल्हा / तालुका पेसा समन्वयका मधून कौशल्य चाचणी मध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या<br>मुलाखती घेणे व<br>अंतिम निवड यादी जाहीर करणे. | 24.01.2018<br>(बुधवार) |
| 8 | पात्र उमेदवारांची मूळ कागदपत्रांची छाननी करुन नियुक्ती आदेश देणे. | 26.01.2018<br>(शुक्रवार) |

(सही/-लक्ष्मीनारायण मिश्रा,भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद रत्नागिरी

# राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान

## कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांसाठी अर्ज.

(राज्य / विभाग/जिल्हास्तर लिहावा. व त्याप्रमाणे संबंधित प्राधीकरणाकडे अर्ज करावा.)

| |
|---|
| अर्जदाराने स्वत: चा फोटो साक्षांकीत करुन येथे लावने आवश्यक आहे. |

प्रति,

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी

विषय : अर्ज करीत असलेल्या पदाचे नांव :- ---------------------------------------------

डी.डी. क्रमांक ---------------- बँकेचे नाव -------------------रक्कम-------

| | | |
|---|---|---|
| 1* | अर्जदाराचे संपूर्ण नांव | (आडनांव स्वत:चे नाव वडिलांचे नाव) |
| 2 | उमेदवाराचे नावात बदल असल्यास (सोबत पुरावा आवश्यक) | (आडनांव स्वत:चे नाव वडिलांचे नाव) |
| 3 | अर्जदार स्त्री आहे कि पुरूष | स्त्री / पुरूष |
| 4 | अर्जदार विवाहित आहे कि अविवाहित | विवाहित / अविवाहित |
| 5* | पत्र व्यवहाराचा पत्ता | |
| 6 | कायमचा पत्ता | |
| 7* | ई-मेल (पत्र व्यवहार करण्यासाठी आवश्यक) | |
| 8 | दूरध्वनी क्रमांक | |
| 9* | मोबाईलक्रमांक | |
| 10 | जात व पोटजात | |
| 11 | अर्जदाराची जन्म तारीख | दिनांक ------- महिना-------- वर्ष-------- |

| | | |
|---|---|---|
| 12 | अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकास म्हणजे दिनांक 08.01.2018 रोजीचे वय | वर्ष ------ महिना------ दिवस ------ |
| 13* | अर्जदाराची शैक्षणिक अर्हता | (उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचा तपशिल) |

| **शैक्षणिक पात्रता** | **परिक्षा मंडळाचे नाव / विद्यापिठाचे नांव** | **उत्तीर्ण वर्ष** | **एकूण गुण** | **प्राप्त गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| SSC | | | | | |
| HSC | | | | | |
| पदवी | | | | | |
| पदव्युत्तर पदवी | | | | | |
| **इतर शैक्षणिक अर्हता** | | | | | |

| | |
|---|---|
| 14* | इतर शैक्षणिक अर्हता तपशिल |

| **अ.क्र.** | **इतर प्रमाणपत्र/ अभ्यासक्रम** | **बोर्ड** | **उत्तीण झाल्याचे वर्ष** | **प्राप्त गुण** | **%** |
|---|---|---|---|---|---|
| 1 | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. | | | | |
| 2 | मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. | | | | |
| 3 | MS-Office | | | | |
| 4 | MS-CIT प्रमाणपत्र. | | | | |
| 5 | टॅली | | | | |

| | |
|---|---|
| 15* | अनुभव (सध्या कार्यरत असलेल्या कार्यालयापासून) |

| अ.क्र. | कार्यालयाचे नांव | पद | रूजू झाल्याचा दिनांक | एकूण अनुभव | कामाचे स्वरूप |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| | |
|---|---|
| 16* | अर्जा सोबत जोडलेली प्रमाणपत्रे |
| | 1. |
| | 2. |
| | 3. |
| | 4. |
| | 5. |
| | 6. |

मी श्री. ------------------------------प्रमाणित करतो / करते कि, वर नमूद केलेला तपशिल माझ्या माहितीप्रमाणे सत्य व अचूक आहे. मी प्रमाणित करतो / करते कि, अर्जात नमूद केलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास अर्ज अपात्र करणेस, नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणा-या इतर कारवाईस पात्र राहिल.तसेच सदर पदावरील नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरूपातील निव्वळ कंत्राटी पद्धतीवर असल्याने शासन सेवेत कायम करण्यासाठी हक्क राहणार नाही याची मला पूर्णपणे जाणीव आहेअसून शासन सेवेत कायम करण्यासाठी भविष्यात हक्क सांगणार नाही अशी लेखी हमी देत आहे.

स्थळ :

दिनांक : ---/---/2017 अर्जदाराची स्वाक्षरी

(अर्जदाराचे नाव---------------------------)

**टिप : वरील * चिन्ह असलेली माहिती भरणे अर्जदारास बंधनकारक असेल.**

*** * * * * * * * ***